15:19:50 **नि. फौ.ख .नं. ४७/२०२४**

म. सरकार वि. अभिजीत संभाजी पाटील

**निशाण नं. ३५ /क**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.५</u>**

नाव –जयकुमार बाबुराव सुर्यवंशी

वय – ६१ वर्षे

व्यवसाय – सेवानिवृत्त

पत्ता – पुणे.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु,</u>**

१.मी कोल्हापूर जिल्हयामध्ये ०२ जून २०२३ ते ३१.१२.२०२३ पर्यंत पोलीस उप विभागीय अधिकारी शाहुवाडी विभाग येथे कार्यरत होतो. दि. २०.१०.२०२३ मी कर्तव्यावर हजर असताना सप्टेंबर १९ ते सप्टेंबर २९ या कालावधीत गणेशोउत्सव हा कोडोली पोलीस स्टेशनच्या हद्दीत साजरा करण्यात आला होता. सदर उत्सावाच्या अनुषंगाने तेथील प्रभारी अधिकारी डोईजड यांनी गणपती उत्सावासंदर्भात बैठकी घेतल्या होत्या. तसेच त्यांनी गणेशोउत्सव मंडळांना विविध सुचना देखील दिल्या होत्या. गणेशोउत्सव मंडळांना सदर उत्सव साजरा करण्याच्या परवानी वेळी विविध अटी व शर्ती घालण्यात आल्या होत्या. सदर अटींमध्ये पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९, ध्वनीप्रदूषण कायदा सन २००० प्रमाणे उच्च क्षमतेचे कोणतेही डीचे अगर स्पीकर सिस्टीम वापरणार नाही अशी अट घालण्यात आली होती. सदर अटीमध्ये शांतता झोनमध्ये ५० डेसीबल पेक्षा जास्त वापरता येणार नाही, निवासी झोन ५५, वाणिज्य झोन ६५ डेसीबल पेक्षा जास्त ध्वनी व औद्योगिक साठी ७५ डेसीबल हे सकाळी ६ ते रात्री १०

या कालावधीत  वापरण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या होत्या. रात्री १० नंतर मा. न्यायालयाच्या आदेशानुसार अतिरिक्त ध्वनी प्रदूषण वरील क्षमतेपेक्षा जास्त करण्यास बंदी असल्यामुळे सदर बाबत वापर करू नये अशा सुचना देखील देण्यात आल्या होत्या. सदर डेसिबल क्षमता बाबतचे नियम व वेळेबाबतचे नियम हे शासन परिपत्रकाप्रमाणे ठरवून देण्यात आलेले आहेत. सदर शासन परिपत्रकाची प्रत ही आमचे कार्यालय तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये कार्यरत असलेले सर्व पोलीस स्टेशन यांच्याकडे पाठविण्यात आलेली आहे. दि. २८.०९.२०२३ रोजी कोडोली ग्रामपंचायत मुख्य मिरवणुक मार्ग या ठिकाणी संभाजीराजे तरुण मंडळ यांचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तेथे मिरवणुक चालू होती. सदरची मिरवणुक ही कोडोली ग्रामपंचायत येथील शिवाजी पुतळयाजवळ चालू होती. त्या ठिकाणी अति उच्च क्षमतेचे डी. जे व स्पीकर सिस्टीम यांचा वापर करण्यात आला होता, याची माहिती  कोडोली पोलीस स्टेशनला मिळताच कोडोली पोलीस स्टेशन यांनी ध्वनी प्रदूषण रोखण्याच्या अनुषंगाने एक समिती/पथक स्थापन केली होती. त्याचे प्रभारी हे पी. एस. आय नरेंद्र बाजीराव पाटील हे होते. सदर समिती/पथकामध्ये पोलीस कर्मचारी माने, पो. शिपाई, कृष्णात पाटील, पोलीस शिपाई जाधव हे होते. सदर समितीमधील कर्मचारी हे मिरवणुक चालू होती त्या ठिकाणी पोहचले. सदर समितीतील कर्मचारी यांनी सदर संभाजीराजे तरुण मंडळ यांच्या अध्यक्षांना अतिरिक्त, अतिउच्च दर्जाचा डिजे व स्पीकर बॉक्स वापरू नका अशी सुचना दिली असता, सदर अध्यक्ष व त्या मंडळाचे कार्यकर्ते हे ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यामुळे त्यांनी ध्वनी तीव्रता मापक यंत्राद्वारे दोन पंचांसमक्ष  आवाज मोजणी करून त्याची यंत्रामधून प्रिंट काढली. सदर ध्वनी हा त्यांना १०९.०५ इतक्या डेसिबल आढळून आला. सदर प्रिंट ही २१.०६ वाजण्याच्या सुमारास काढण्यात आली होती. सदरची प्रिंट व घटनास्थळाचा पंचनामा हा २१.०० ते २१.२० या कालावधीत करून त्याची प्रिंट ही मंडळाचे अध्यक्ष यांना देण्यात आली असता, त्यांनी त्याचा स्वीकार केला नाही. सदरबाबतचा कार्यवाहीचा अहवाल समितीतील कर्मचाऱ्यांच्या

वरिष्ठ अधिकारी म्हणजेच प्रभारी अधिकारी ए. पी. आय डोईजड यांच्या मार्फत एस. डी. बी. ओ कार्यालय येथे दि. १८.१०.२०२३ रोजी पाठविला. सदरचा अहवाला आमच्या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर सदर मंडळाचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांना मी गणपती कालावधीमध्ये व मिरवणुकीमध्ये डी. जे चा उच्च ध्वनी क्षमतेचा वापर करून ध्वनी प्रदूषण कायदाचा भंग केला आहे. म्हणून आपणाविरोधात पुढील कार्यवाही का करण्यात येवू नये याचा खुलासा पुढील ६० दिवसांत करण्याच्या अनुषंगाने त्यांना नोटीस पाठविली. आता मला दाखविण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस तीच आहे. त्यावर माझी सही आहे. सदरची नोटीस ही आरोपीने स्वीकारल्याबाबत त्याची सही व त्याचा मोबाईल क्रमांक नमूद आहे. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ३६** देण्यात येत आहे. मी दि. ३१.१२.२०२३ रोजी सेवानिवृत्त झालो. मी सदर दिवशी सेवानिवृत्त होईपर्यंत सदर नोटिसीचा कोणताही खुलासा मला प्राप्त झाला नव्हता. सदर नोटीस मी टपालाद्वारे पाठविली होती त्यामुळे मी आरोपीला ओळखू शकणार नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. आर. एच. पाटील यांचेमार्फत सुरु,**

२. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिरवणुक अनुषंगाने मी प्रत्यक्ष जागेवर गेलेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर ठिकाणी नेमके काय घडले याविषयी मला प्रत्यक्ष माहिती नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मला प्रभारी अधिकारी यांनी अहवाल पाठविला होता. सदर प्रकरणाचा पुढील तपास हा माझे नंतर तेथे आलेले डी. वाय. एस. पी यांनी केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणात नोटीस पाठविण्याव्यतिरिक्त मी अन्य तपास केलेला नाही. सदर प्रकरणातील नोटीस मी बाय हँड पोलिसांद्वारे पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरची नोटीस कोणी लागू केली या विषयी मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीसीवर आरोपी याचे नाव, सही व मो. क्रमांक हे कोणी लिहीले याची मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयाकडून नोटीस

पाठवितेवेळी त्यावर आमच्या कार्यालयाचा जावक क्रमांक नमूद असतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर अनुषंगाने जावक क्रमांक त्याची तारीख व त्या अनुषंगाने जावक रजिस्टरला नोंद असते. हे म्हणणे खरे नाही की, सदर जावक क्रमांकाने मी कोणतीही नोटीस पाठविलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरची नोटीस ही आरोपीला लागू होवून पुन्हा आमच्या कार्यालयाकडे दाखल झाल्याचा आवक क्रमांक नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची नोटीस ही आरोपीला लागू नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची नोटीस ही आरोपीच्या नावाने लागू नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, सदरची नोटीस ही संबंधित पोलीस स्टेशन कारकून यांनी लागू केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीस लागू झाली किंवा कसे याबाबत मी प्रत्यक्ष सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यास नोटीस प्राप्त न झाल्यामुळेच त्याने याबाबतचा खुलासा दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठिकाणी मिरवणुक झाली व त्या ठिकाणी कार्यवाही करण्यात आली असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याने उच्च ध्वनी क्षमता वापरली असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर वेळी कार्यवाही करण्यात आली व त्याचा अहवाल मला प्राप्त झाला असे मी खोटे सांगतो.

४. हे म्हणणे खरे आहे की, सदरची नोटसी ही किती तारखेला लागू झाली याचा उल्लेख दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयामार्फत पाठविण्यात आलेल्या नोटिसीचा अहवाल हा परत आमच्या कार्यालयाकडे प्राप्त होतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीस अनुषंगाने अहवाल प्राप्त झाल्याचा उल्लेख या नोटीसवर दिसून येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही नोटीस मी आरोपीला काढलेली नव्हती, तशी कोणतीही नोटीस आरोपीला प्राप्त झालेली नव्हती, त्यामुळे सदर नोटीस प्राप्त झाल्यबाबतचा

अहवाल या नोटीसवर नमूद नाही.  हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वरिष्ठांकडून गणेशोउत्सव मंडळ कार्यकर्तेवर कार्यवाही करण्याचा आदेश प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने केवळ कोटा पूर्ण करण्याच्या हेतूने सदरची खोटी नोटीस पाठविलेली आहे.  हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.  हे म्हणणे खरे नाही की,  आरोपी यास मी कारणे दाखवा नोटीस पाठविल्याचे खोटे कथन करत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

15:24:41

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-
**(के.दि.काकतकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा

दिनांक. १३.०५.२०२६